**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**गुरुवार, दिनांक ३० जुलै, २०२० / श्रावण ८, १९४२ (शके)**

**६८. लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की :-**

संदर्भ : या सचिवालयाचे पत्रक भाग दोन क्रमांक ५९, दिनांकित ६ जुलै, २०२०

महाराष्ट्र विधानसभेच्या **सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२०** पासून विधानभवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या **सन २०२० च्या तृतीय (पावसाळी)** अधिवेशनासाठी द्यावयाच्या लक्षवेधी सूचना MOIS या संगणक प्रणालीवर संपूर्णत: **ऑनलाईन (online) पध्दतीने सोमवार, दिनांक २७ जुलै, २०२०** पासून **सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत स्वीकारण्याबाबत उपरोक्त संदर्भाधीन पत्रक भाग दोनव्दारे कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने बुधवार, दिनांक २९ जुलै, २०२० पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचना सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० पासून सुरु होणाऱ्या अधिवेशनाच्या कार्यवाहीत घेण्यात येतील व बुधवार, दिनांक २९ जुलै, २०२० रोजी सायंकाळी ५.०० नंतर सूचना स्वीकारणे स्थगित करण्यात येईल. त्याचप्रमाणे **सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२०** पासून विधानभवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या **सन २०२० च्या तृतीय (पावसाळी)** अधिवेशनासाठी द्यावयाच्या लक्षवेधी सूचना **मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार व म.वि.स. नियम १०५ अन्वये MOIS** या संगणक प्रणालीवर **संपूर्णत: ऑनलाईन (online) पध्दतीनेच सोमवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२०** पासून **सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : ३० जुलै, २०२०.

**राजेन्द्र भागवत,**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

याची प्रत :-

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
३. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
४. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
६. मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
७. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील पक्ष कार्यालये.
८. मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
९. संगणक कक्ष (WEBSITE)
१०. एम.के.सी.एल कक्ष (MKCL)